Literacy for a Billion

Movie: Shabas sunbai
Year: 1986

Song: Aadhi hote itrazi
Lyricist:

आधी होते इतराजी
मग कसे झाले राजी
आधी होते इतराजी
मग कसे झाले राजी
माझे मन माझे मन
माझे मन तुझे मन
माझे मन तुझे मन

माझ्यात मी दंग होते
चालताना माझी वाट
माझ्यात मी दंग होते
चालताना माझी वाट
एका वेड्या वळणाने
पटविली खुण गाठ
पटविली खुण गाठ
जणू अनोळखी झाले
गमावून माझेपण
माझे मन माझे मन
माझे मन तुझे मन
माझे मन तुझे मन

रानातला रावा कधी
भुलेल का पिंजऱ्याला
हो रानातला रावा कधी
भुलेल का पिंजऱ्याला
रेशमाच्या धाग्यामध्ये
पारधीच कैदी झाला
रेशमाच्या धाग्यामध्ये
पारधीच कैदी झाला
उभा जन्म बंदीवान
तरी जाई सुखावून
माझे मन माझे मन
माझे मन तुझे मन
माझे मन तुझे मन

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*